# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.04.2025** **वारःबुधवार**

---

1) वक्फ सुधारणा विधेयकावर आज लोकसभेत चर्चा
2) डिजिटल व्यवहारांमध्ये जागतिक पातळीवर महत्त्वाचं स्थान मिळवून देण्यात रिझर्व्ह बँकेचा मोठा वाटा असल्याचे राष्ट्रपतींचे गौरवोद्गार
3) नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी शेअर बाजारात मोठी घसरण
आणि
4) बेल्जियममधील अश्वारोहण स्पर्धेत निहारिका सिंघानियाला सुवर्ण पदक

**वक्फसुधारणा**

वक्फ सुधारणा विधेयक आज लोकसभेत सादर करण्यात येणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्याकडे अल्पसंख्याक व्यवहार विभागाचाही कार्यभार असून ते आज सभागृहात हे विधेयक मांडतील. विधेयकावर ८ तासांची चर्चा घेण्यात येईल आणि सभागृहाला आवश्यक वाटल्यास चर्चेचा कालावधी वाढवण्यात येईल असं त्यांनी संसद भवन परिसरात प्रसार माध्यमांना सांगितलं. या विधेयकाबाबत कोणत्याही
प्रश्नांची उत्तरं द्यायची सरकारची तयारी आहे, असं सांगून रीजीजू म्हणाले की विरोधी पक्षांना अनुनयाचं धोरण राबवायचं असल्याने ते या विधेयकाला विरोध करत आहेत.
दरम्यान वक्फ सुधारणा विधेयक मांडलं जाणार असल्याने भाजपा, शिवसेना आणि काँग्रेसनेही आपापल्या खासदारांना आजपासून पुढचे तीन दिवस लोकसभेत हजर राहण्याबाबतचा पक्षादेश काढला आहे.

**आरबीआय राष्ट्रपती**

रिझर्व्ह बँक ही देशाच्या आर्थिक स्थैर्याचा आधारस्तंभ असून भारताला डिजिटल व्यवहारांमध्ये जागतिक पातळीवर महत्वाचं स्थान मिळवून देण्यात रिझर्व्ह बँकेचा मोठा वाटा आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढले. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या वर्धापनदिनाचा सांगता सोहळा काल मुंबईत
राष्ट्रपतींच्या उपस्थितीत पार पडला; त्यावेळी त्या बोलत होत्या. सामान्य नागरिकांचा भारतीय रिझर्व्ह बँकेवरचा विश्वास हेच रिझर्व्ह बँकेचं गेल्या नऊ दशकातलं सर्वात मोठं यश आहे, असं त्या म्हणाल्या. विकसित भारताच्या दिशेने पुढे जात असताना, अर्थव्यवस्थेतील नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी

नाविन्यपूर्ण आणि समावेशक वित्तीय प्रणाली आवश्यक असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनं आगामी दशक अतिशय महत्त्वाचं असून आर्थिक समावेशन, ग्राहक सुरक्षा आणि आर्थिक प्रगतीसाठी भारतीय रिझर्व्ह बँक वचनबद्ध आहे, अशी ग्वाही गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्वागतपर संबोधनात दिली. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपस्थित होते.

**सीबीआय दिवस**

नवीन युगात केवळ कायदा पुरेसा असू शकत नाही, गुन्हेगारी रोखण्यासाठी तांत्रिक आणि कायदेशीय दृष्टिकोन ठेवला पाहिजे असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल केलं. केंद्रीय अन्वेषण ब्यूरो अर्थात सी बी आय च्या 62 व्या स्थापना दिनानिमित्त नवी दिल्ली इथं काल आयोजित करण्यात आलेल्या 21 व्या डी. पी. कोहली स्मृति व्याख्यानमालेत ते बोलत होते. नवीन युगातील आव्हानं विशेषतः कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी सीबीआय नं स्टार्ट अप्स, उद्योग आणि शैक्षणिक संस्थांकडे अधिक सहकार्यानं पाहिलं पाहिजे असंही ते यावेळी बोलताना म्हणाले.

**नक्षलवाद**

देश नक्षलमुक्त होण्याच्या दिशेने मोठी पावलं उचलत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समाजमाध्यमांवरील संदेशात म्हंटलं आहे. देशातील नक्षलवादी जिल्हयाची संख्या 12 वरुन 6 वर आणण्यात सरकारला यश आल्याचं त्यांनी नमूद केलं.
केंद्र सरकार, नक्षल चळवळी विरोधात कठोर पावलं उचलत असून, सशक्त, सुरक्षित आणि समृद्ध भारताची निर्मिती करत आहे. 31 मार्च 2026 पर्यन्त देशातून नक्षल चळवळ समूळ नष्ट होईल असा विश्वास शाह यांनी व्यक्त केला आहे.

**संरक्षणनिर्यात**

गेल्या आर्थिक वर्षात देशाच्या संरक्षण क्षेत्राच्या निर्यातीत 12 टक्क्यांनी वाढ होऊन ती विक्रमी 23 हजार 600 कोटी रुपायांहून जास्त झाली आहे. यात, संरक्षण क्षेत्रातील सरकारी कंपन्यांचा वाटा सुमारे 43 टक्के म्हणजे 8 हजार 3 शे 89 कोटी रुपये आहे. 2 हजार 29 सालापर्यंत, ही निर्यात 50 हजार कोटी रुपयांपर्यंत नेण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी समाजमध्यमांवरील संदेशात म्हंटलं आहे.

**ऑपरेशन ब्रम्हा**

भारत सरकारतर्फे, म्यानमा मधील भूकंपग्रस्तांना "ऑपरेशन ब्रह्मा' अंतर्गत मदत पुरवण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून भारतीय वैद्यकीय पथकानं स्थापन केलेल्या आर्मी फील्ड रुग्णालयात 104 रुग्णांवर उपचार करण्यात आले तर दोन मोठ्या शास्त्रक्रियादेखील करण्यात आल्या असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. 16 टन मानविय मदत आणि आपत्ति निवारण साहित्य घेऊन जाणारं

भारतीय हवाई दलाचं एक विमान काल दुपारी 2 वाजता म्यानमामधील मंडाले विमानतळावर  पोहोचलं. मदतीसाठी मंडाले इथं उतरणारं हे पहिलंच  विमान होतं.

**<u>शेअर बाजारात घसरण</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भरमसाठ आयात शुल्क लादणार असल्याच्या शक्यतेनं नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी शेअर बाजारात काल  मोठी घसरण झाली. निर्देशांकात  १ हजार ३९० अंकांची घट होऊन तो, ७६ हजार २४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेयर बाजाराचा निर्देशांक अर्थात  निफ्टी च्या निर्देशांकातही ३५४ अंकांची घट झाली आणि तो २३ हजार १६६ अंकांवर स्थिरावला.

**<u>चिली पंतप्रधान भेट</u>**

भारत आणि चिली यांनी व्यापार आणि गुंतवणूक वाढवण्यासाठी व्यापक आर्थिक भागीदारी करार केला असून त्याला सहमति दर्शवली आहे. चिलीचे पंतप्रधान गॅब्रिएल बोरीक फोन्ट सध्या भारत भेटीवर आहेत. या भेटी दरम्यान  काल हा निर्णय झाला असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालायचे  सचिव पेरीयासामी कुमारंन यांनी नवी दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितलं. दोन्ही देशांमध्ये सध्या आंशिक व्यापार करार आहे त्यामध्ये वाढ करून व्यापक परराष्ट्र व्यापार करारामध्ये विस्तार करणं हा यामागचा उद्देश असल्याचं कुमारन यांनी सांगितलं.

**<u>गुजरात-आग</u>**

गुजरात मधील बनासकांठा जिल्ह्यातील दिसा येथील फटक्याच्या कारखान्याला लागलेल्या आगीत 18 जणांचा मृत्यू झाला असून, अद्यापही 23 जण अडकले असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवलं असूंन, ढीगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी बचाव कार्य सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून, राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 2 लाख तर जखमींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 50 हजारांची मदत जाहीर केली आहे. राज्य सरकारतर्फे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ४ लाख तर जखमींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 50 हजार रुपयांची ची मदत जाहीर केली आहे.

**<u>ऑडिशादिवस</u>**

केंद्र सरकारनं ओडिशाला 73 हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे विकास प्रकल्प दिले असल्याचं केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं, ते काल नवी दिल्ली इथं ओडिशा दिनानिमित्त आयोजित समारंभात बोलत होते. 1 एप्रिल 1936 ला ओडिशा हे स्वतंत्र राज्य म्हणून घोषित करण्यात आलं त्यानिमित्त ओडीशा दिवस साजरा केला जातो. या कार्यक्रमाला  ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण मांजी, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, केंद्रीय आदिवासी व्यवहार मंत्री जुयाल ओराम ही यावेळी उपस्थित होते.

**<u>महाराष्ट्र</u>**

महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र सायबर गुन्हे सुरक्षा महामंडळाची रूपरेषा जारी केली आहे. हे महामंडळ स्थापन केल्याने नगरिकांचं तसंच खाजगी क्षेत्रातील कंपन्यांचं सायबर गुन्ह्यापासून आणि संबंधित धोक्यांपासून संरक्षण होईल असा दावा राज्य सरकारने केला आहे. यापूर्वी सायबर गुन्हे विभाग राज्य पोलिसांच्या अधीन होता. यासाठी महामंडळ स्थापन करण्याला गेल्या महिन्यात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**RBI-दोनहजारनोटा**

आतापर्यंत २००० रुपयांच्या ९८ टक्क्यांहून अधिक नोटा रिझर्व्ह बँकेकडे परत आल्या असून, ६ हजार ३ शे ६६ कोटी रुपये मूल्यांच्या नोटा अद्यापही लोकांकडे आहेत माहिती रिझर्व्ह बँकेने दिली आहे. रिझर्व्ह बँकेने १९ मे, २०२३ रोजी २००० रुपये मूल्याच्या चलनी नोटा बँकेकडे परत करण्याचा आदेश जारी केला होता. या नोटा परत करण्याची मुदत ७ ऑक्टोबर २०२३ पर्यन्त होती; तथापि रिझर्व्ह बँकेच्या १९ कार्यालयांमधे या नोटा बदलण्याची सुविधा अद्यापही उपलब्ध आहे.

**निहारिका सुवर्ण**

तरुण भारतीय महिला घोडेस्वार निहारिका सिंघानिया हिने बेल्जियम मध्ये झालेल्या अझेल हॉफ सीएसआय लायर अश्वारोहण स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाला. कौशल्य आणि समर्पणाचं उत्कृष्ट प्रदर्शन करत नीहरीकानं भारताला या आंतरराष्ट्रीय क्रीडा प्रकारात सुवर्णपदक मिळवून दिल आहे.

**आयपीएल**

आयपीएल टी 20 क्रिकेट स्पर्धेत काल रात्री लखनौ इथं झालेल्या सामन्यात किंग्स इलेव्हन पंजाब नं लखनौ सुपर जायंट्स संघाचा 8 गडी राखून पराभव केला. त्याआधी किंग्स इलेव्हन पंजाब नं नाणेफेक जिंकून क्षेत्र रक्षणाचा निर्णय घेतला. यजमान लखनौ सुपर जायंट्स संघानं निर्धारित 20 शतकात 7 गडी बाद 171 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल किंग्स इलेव्हन पंजाब नं 16 पूर्णांक 2 षटकात लक्षाचा सहज वेध घेतला.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**